सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षी राज्यातील एम.बी.बी.एस., बी.डी.एस. व इतर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यासाठी सामाईक परीक्षा आयोजित करण्याबाबत...

# महाराष्ट्र शासन

## वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग

शासन निर्णय क्रमांक एमईडी १०१३/प्र.क्र.३४८/शिक्षण-२
"मंत्रालय", गो.ते. रुग्णालय संकुल, ९वा मजला, लोकमान्य टिळक मार्ग,
मुंबई ४०० ००१ दिनांक : 27 AUG 2013

**वाचा** :

१. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांचे पत्र क्रमांक संवैशिवसं/शैव-२०१४-१५/ परीक्षा/ प्रसिध्दी/ २०१३/ १-अ, दिनांक ०६/०८/२०१३.
२. भारतीय आयुर्विज्ञान परिषदेची राजपत्रित अधिसूचना क्रमांक MCI-31 (1)/ 2010-MED/ 49068, दिनांक २१/१२/२०१०
३. भारतीय दंत परिषदेची राजपत्रित अधिसूचना क्रमांक DE-22-2012, दिनांक ३१/०५/२०१२

**प्रस्तावना**

टी.सी. (सिव्हील) क्रमांक ९८/२०१२, खिस्चन मेडिकल कॉलेज, वेल्लोर व इतर विरुध्द भारतीय संघराज्य व इतर आणि अन्य संबध्द प्रकरणी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १८/०७/२०१३ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयान्वये भारतीय आयुर्विज्ञान परिषदेच्या व भारतीय दंत परिषदेच्या "नीट (युजी) २०१३" बाबतच्या संदर्भाधीन अधिसूचना रददबातल ठरविल्या आहेत. त्यामुळे सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षी राज्यातील शासकीय, शासन अनुदानित व महानगरपालिकेच्या महाविद्यालयांमधील

एम.बी.बी.एस., बी.डी.एस. व इतर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यासाठी सामाईक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्याची जबाबदारी पुन्हा राज्य शासनावर आली आहे. तथापि, उक्त सामाईक प्रवेश परीक्षेचा पाठयक्रम व स्वरुप हे राज्य शासनातर्फे यापूर्वी घेण्यात येणाऱ्या "एमएचटी-सीईटी" प्रमाणे असावे किंवा उक्त "नीट (युजी) २०१३" प्रमाणे असावे, हा प्रश्न उदभवला आहे.

२. उक्त परिषदांना वैद्यकीय/ दंत अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी "नीट" प्रमाणे सामाईक प्रवेश परीक्षा घेण्याचे अधिकार नाहीत, असे कारण नमूद करुन मा. सर्वोच्च न्यायालयाने उपरोक्त अधिसूचना रददबातल ठरविल्या आहेत. तथापि, भारत सरकारने या संदर्भात अध्यादेश/ अधिनियम प्रख्यापित केल्यास पुन्हा उक्त "नीट" प्रमाणे देशभरात एकच सामाईक प्रवेश परीक्षा लागू होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसे झाल्यास महाराष्ट्रातील विद्यार्थी उक्त परीक्षेकरिता तयार असावेत म्हणून सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षाकरिता राज्य शासनातर्फे घ्यावयाच्या सामाईक प्रवेश परीक्षेचे पाठयक्रम व स्वरुप हे उक्त "नीट" प्रमाणेच असावे, असे संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई, यांनी त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये प्रस्तावित केले आहे.

३. या विषयाच्या सर्व पैलूंचा साकल्याने विचार करुन व या संदर्भात भारत सरकार घेईल त्या निर्णयाच्या अधीन, महाराष्ट्र शासनाने आता खालील निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय

सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षी राज्यातील शासकीय, शासन अनुदानित व महानगरपालिकेच्या महाविद्यालयांमधील एम.बी.बी.एस., बी.डी.एस. व इतर आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांचे प्रवेश करण्यासाठी राज्य शासनातर्फे "एमएच-सीईटी २०१४" या नावाने एक सामाईक प्रवेश परीक्षा घेण्यात येईल.

२. उक्त "एमएच-सीईटी २०१४" या परीक्षेचे पाठयक्रम व स्वरुप हे "नीट (युजी) २०१३" प्रमाणेच राहील.

३. उक्त परीक्षेच्या प्रश्नपत्रिका ह्या मराठी, इंग्रजी व उर्दू या तीन भाषांमध्ये काढण्यात येतील.

४. उक्त परीक्षेचा दिनांक यथावकाश जाहीर करण्यात येईल.

५. सदरहू शासन निर्णयाशी सुसंगत नसेल अशी कोणतीही तरतूद अधिक्रमित झाल्याचे समजण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

कृ.भि.केंगा

**( कृ.भि. केंगा )**
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई.
मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. उप मुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे खासगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, आयुष संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक.
कार्यालयीन सचिव, प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई
आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
सर्व अधिष्ठाता, सर्व शासकीय/ महानगरपालिकेची वैद्यकीय/ दंत/ आर्युवेद/ शुश्रूषा महाविद्यालये.
सर्व शासन अनुदानीत आर्युवेद/ युनानी महाविद्यालये
सचिव, भारतीय आयुर्विज्ञान परिषद, नवी दिल्ली
सचिव, भारतीय दंत परिषद, नवी दिल्ली
सर्व सह/ उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधिद्रव्ये विभाग, मुंबई
निवडनस्ती (शिक्षण-२).